Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांनी दिग्दर्शित केलेल्या वेगवेगळया नाटकातील दिग्दर्शकीय कौशल्याचां अभ्यास

**माया भगवान बोर्डे**
संशोधक विद्यार्थीनी (Ph.D)
नाट्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद

**डॉ.अशोक गुराप्पा बंडगर**
संशोधक मार्गदर्शक
नाट्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद

**प्रस्तावना:-**

अभिजीत झुंजारराव हे मुळचे ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील निवाळपाडा नावाच गाव आहे त्या ठिकाणातील अभिजीत झुंजारराव आता कल्याणमध्ये निवास स्थान आहेत. त्याचे कॉम्पुटर इंजिनियरींग झाल असून नॅशनल स्कुल ऑफ ड्रामाचा कोर्स देखील केला आहे. मुळामध्ये नाटक बघायला त्यांना आवडतात अनेक नाटके बघितली नाटक बघीतल्या मुळे जाणिव समृध्द होत असतात असे विचाराचे अभिजित झुंजारराव आहेत. त्यांच्यावर जयदेव हट्टंगडी सर यांचा प्रभाव पडला, त्यांच्या कडून ते खुप काही शिकले, उषा गांगुलीचे नाटक बघुन प्रयोग पाहून भारवून गेले सादरीकणातील अफाट एनर्जी, सुसूत्रता, शिस्त एकत्रित परिणाम हे खुपच भावले "रतन थियामांच नाटक पाहत गेलो, त्याची वेगळी रंगभाषा होती ज्याला Physical Dancical Theatre म्हणता येईल "

समकालिक दिग्दर्शकामध्ये मराठीतले विजय निकम आणि बुध्ददास कदम या दोन दिग्दर्शकांचा देखील अभिजित झुंजारराव यांचावर प्रभाव पडला. त्यांची कल्याण मध्ये अभिनय कल्याण संस्था या संस्थेअंतर्गत नाटक सुरु केली त्याच्यां नाटक सादर करण्यात कुठलाही अभिनिवेश नसतो. नाटक मांडताना ते रंगमंचीय अवकाशात जो ठेहराव घेतात. तो दिसतो व ऐकू येतो. त्यांनी अनेक नाटक, एकांकिका दिग्दर्शित केल्या असून या शोध निबंधामध्ये त्यांच्या काही निवडक नाटकाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

1) लेझीम खेळणारी पोर
2) दर्दपोरा
3) माकड
4) घटोत्कच
5) ए आपण चहा घ्यायचा ?

या नाटका चा अभ्यास करण्यात येणार आहे. दिग्दर्शक म्हणजे काय, अभिजित झुंजारराव यांच्या दृष्टिने दिग्दर्शकाचे कौशल्य काय असायला पाहिजे. विषय निवडीवरुन सादरीकरणाच्या पध्दतीवरुन त्याच्या दिग्दर्शकीय दृष्टिकोन कसा आहे. त्याच्या कौशल्याचा अभ्यास महत्वपुर्ण आहे.

**अभिजित झुंजारराव - दिग्दर्शकाची व्याख्या:**

मुलाखती दरम्यान सांगण्यात आलेली दिग्दर्शकाची व्याख्या:-

नाटकाचा पहिला प्रेक्षक दिग्दर्शक असतो तो नाटक पहिल्यांदा बघत असतो,म्हणजे तो जो नाटक बघायला येणारा प्रेक्षक आहे. जो भरपुर संख्येने येणार आहे.तर त्याला सहज सोप्या कश्या गोष्टी होतील व त्याला त्रास होणार नाही.म्हणजेच नाटक बघत असतानाचा पाहिला प्रेक्षक दिग्दर्शक आहे. दिग्दर्शक हा स्टोरी टेलर आहे तो एक गोष्ट सांगणार आहे. ती गोष्ट कशी पोहचवयाची हे त्याला माहित असल पाहिजे,ते म्हणजे दिग्दर्शन त्याला गोष्टीचा जॉनर काय आहे ती गोष्ट कशी आसते. म्हणजेच एक प्रेक्षक असणे व उत्तम स्टोरी टेलर असण म्हणजे दिग्दर्शक.

**अभिजित झुंजारराव यांच्या दृष्टिकोनात दिग्दर्शकाचे कौशल्य पुढील प्रमाणे आहेत.**

**मुलाखती च्या दरम्यान सांगण्यात आलेले कौशल्य :-**

- दिग्दर्शक उत्तम टिम लिडर असावा.
- टिम मधील व्यक्तीची मानसीकता दिग्दर्शकाला माहिती असली पाहिजे.
- कलाकांर व तांत्रिक लोकांकडून काम कसे काढून घ्यायचे ही हातोटी त्याला असली पाहिजे.
- पात्राची निवड चोख करता आली पाहिजे व दिग्दर्शकाला पात्राकडून अभिनय काढून घेता आला पाहिजे.
- सगळ्या तांत्रिक घटकाची जाण दिग्दर्शकाला असली पाहिजे.
- संगीताचा कान असला पाहिजे.
- फोटोग्राफीचे डोळे असले पाहिजे.
- दिग्दर्शकाना नाटकाची पोत समजायला पाहिजे
- दिग्दर्शकाचे निरिक्षण चांगले असावे.
- प्रत्येक दिग्दर्शक ॲक्टर आहे त्याला अभिनयाच ज्ञान असावे
- संहितेचे ज्ञान असावे
- दिग्दर्शकाला स्मेल च ज्ञान असाव

  उदा. दर्दपोरा नाटक मुस्लीम बॅकग्राऊंड चे होते. त्या नाटकासाठी अत्तर लोबान (स्मेल आहे)यांचा उपयोग करण्यात आला असून याचा उपयोग कालाकारांनी केला म्हणजे अत्तर लावून नाटक केले अतिशय वेगळा परिणाम त्यामुळे होतो व नाटकाची पोत जवळ कलाकार,प्रेक्षक पोहचतात.
- रंगमंचीय अवकाशाच भान असाव ती एक कला दिगदर्शकाला खूप छान पद्धतीने अवगत असायला पाहिजे.

वरील वेगवेगळ्या कौशल्य दिग्दर्शकाने सांगीतले असून अभिजित झुंजारराव यांचे मत आहे. या व्यतिरिक्त संशोधक म्हणून त्याच्या मध्ये काही कौशल्य वरील संदर्भाच्या अनुषगाने दिसून येतात. एका दिग्दर्शकाची दृष्टिचौफेर असणे महत्वाचे आहे, हे कौशल्या अभिजित झुंजाराव यांच्या मध्ये दिसुन येतात. निरिक्षण असणे,एकाग्रता असणे वाचन असणे महत्वाचे आहे. इतर लोकांकडे बघून अनुभव घेणे महत्वाचे आहे त्यांचा मध्ये प्रेझेन्स ऑफ माईंड असणारा दिग्दर्शक असून अभिजित

झुंजारराव हे एक कुशल दिग्दर्शक आहेत. त्यांनी प्रायोगिक नाटके केली आहेत व गेल्या दहा ते पंधरा वर्षात स्पर्धेची नाटके सातत्याने करित आहेत.

**लेझीम खेळणारी पोर :-**

"मुळात हा कविता संग्रह आहे आणि त्याला नाटकात उतरवणं आव्हान होतं, 38 कवितांचा संच या नाटकात सादर केला आहे. संजय कृष्णाजी पाटील यांच्या ह्या कविता होत्या" मुळात हा कविता संग्रह आहे आणि त्याला नाटकाच्या स्वरुपात मांडले हे वरील संदर्भातून स्पष्ट होते. मुळात 'लेझीम खेळणारी पोर' ही शैली नसून मुक्तछंद आहे. 2013 ला हे नाटक 10 ते 12 लोक घेऊन अभिजित झुंजारराव यांनी केल होत. सगळे कलाकार नट हे वेगवेगळ्या जॉनर चे होते कोणी वाचिक,अभिनयात उत्तम होते तर कोणी आंगिक अभिनयात उत्तम होते 2 ते 3 महिने तालिमी सुरु होत्या. या नाटकात कुठे ही निवेदक नव्हता कुठेही ब्लक आऊट नव्हते.

कुठेही लेखकाचा एकही शब्द वजा करणार नाही. ज्या कविता संजय कृष्णजी पाटील यांनी लिहिल्या त्या तशाच्या तशा सादर करण्यात आल्या. आशय तोच ठेवून त्याच्या दृष्य परिणाम जो आहे त्याची जी चौकट आहे ती चौकट मात्र थोडीशी इकड-तिकड झाली असेल. या नाटकाचे विशेष असे होते की कुठेही अस वाटत नव्हते की एक कविता संपली आणि दुसरी सुरु झाली, प्रेक्षकांना ते कळून यायचे हे या नाटकाचे यश आहे.

पार्श्वसंगीत, नेपथ्य आणि प्रकाश योजना या तांत्रीक बाजुनां या फॉर्ममध्ये खूप महत्व आहे आणि ते तंत्रज्ञानी समर्थपणे पेललं, कमीतकमी नेपथ्य वापरल म्हणता येईल. नटांच्या शरीराने नेपथ्यांच काम केल, पार्श्वसंगीत आणि प्रकाश या दोन अगांवर खूप भिस्त होती म्हणजे तांत्रिक बाजू देखील महत्वाची भुमिका पार पाडतात तांत्रीक बाबीमुळे एक परिणाम गोष्टीचा ठाशीव झाला. या नाटकात पथनाट्य, नाट्यभाग व मुक्त छंद होता असे म्हणता येऊ शकते.

**दर्दपोरा :-**

'दर्दपोरा' हे वास्तववादी नाटक आहे मुळामध्ये दर्दपोरा नावाच गाव कश्मीर मध्ये आहे.त्या गावाची ती गोष्ट आहे जीथे एक तर विधवा स्त्रीया राहतात किंवा नवरे बेपत्ता झाले आहेत अशा बायका राहतात. परंतु केवळ एक गावाची गोष्ट न दाखवता दिग्दर्शकाने या गोष्टीला सर्वंची ती गोष्ट आहे सगळ्या स्त्रीयांच दु:ख आहे असे दाखवले आहे त्यांच्या दिग्दर्शनातील नाविण्य आहे. या नाटकासाठी नि.दा.फाजलीन च्या कवितेचा वापर या नाटका साठी करण्यात आला असून हे त्याचे वेगळेपण आहे.

"काश्मीर मधील वातावरण आणि हुबेहुब दृश्यांकित केलेले कब्रस्तान एकांकिकेच्या नाट्याविषयाला परिणामकारक उंची देणारे आहे." एकंदरीत कश्मीरचे बॅक ग्राऊंड दाखवण्यात आले आहे. तरी देखील ती गोष्ट कश्मीर पुरतीच नाही. नाट्यदिग्दर्शकीय कौशल्यातुन रंगचळवळीत नाव कमावलेला अभिजित झुंजारराव दर्दपोरा च्या माध्यमातून वेगळा नाट्यनुभव देतात.

**माकड :-**

"सरदेशपांडे" लिखित आणि अभिजित झुंजारराव दिग्दर्शित 'माकड' हे सद्या राजकीय परिस्थितीवर थेट टिप्पणी करणारं नाटक नुकतंच रंगमंचावर आलेलं आहे मध्यमवर्गाच्या झालेल्या

कोंडीबद्दल आणि त्यांच्या हतबलतेकडे निर्देश करणार हे नाटक आहे.” मराठी व्यवसायीक रंगभूमीवर राजकीय नाटक करण्याच धाडस सहसा कुणीही करीत नाही अशा सहिता सादरीकरणाचे आव्हानच असतात ते कल्पक दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांनी पेलले आहे असे म्हणता येईल नाटकाचे तांत्रिक अंगे ही एकमेकांना पुरक व परिपुर्ण आहेत. आजच्या राजकीय वास्तवावर टोकदार भाष्य करण्याचा प्रयत्न या नाटकातून केला असून, त्यांनी अतिवास्तववादाचा आधार त्या करता घेतला आहे. परंतु मांडणी मात्र वास्तवादर्शी केली आहे. संपुर्ण प्रयोग दिग्दर्शकाने वास्तवदर्शी शैलीत बसवलां आहे. हे देखील दिग्दर्शक म्हणून एक धाडसच म्हणाव लागेल.

**घटोत्कच :-**

“घटोत्कच हे महाभारतातले एक महत्वाचे पात्र भीम आणि राक्षसिणी हिडिंबा यांचा हा पुत्र घड्याच्या आकाराचे केशहीन डोके असल्याने त्याला घटोत्कच म्हटले जाते.” लेखक आशितोष दिवाण यांना घटोत्काच्या जीवनात जे नाट्य दिसले ते सर्वकालिक सत्याकडे घेऊन जाणारे हे नाटक म्हणजे महाभारताची पुर्वापार माहित असलेली गाथा नसून महाभारताच्या अप्रकाशित बाजुवर टाकलेला प्रकाश आहे. "इतिहासातील पात्रे शुर तत्वनिष्ठ आणि धर्मनिष्ठ अशी त्यांची प्रतिमा आपल्या मनात ठासलेली असते, तोच विचार -संस्कार घेऊन आपण जगत असतो.

पांडव म्हणजे सकारात्मकता आणि कौरव म्हणजे नकारात्मकता हे सुत्र जणू निश्चित झालेली असते,पण या रुढ संकल्पनेला छेद देऊन महाभारतातील व्यक्तिरेखा मानवी दृष्टिकोणातून मांडण्याचा एक यशस्वी प्रयत्न म्हणजे घटोत्कच चे नाटक." नाटकाचा आशय वरील संदर्भातून सांगण्यात आला आहे हे नाटक दिग्दर्शकाने समकालीन नाटक केल होत. आत्ताच्या परिस्थितीवर भाष्य करणारे नाटक होते. सत्तेच्या विरोधात देखील नाटकाच्या माध्यमातून दिग्दर्शकाला बोलता आल पाहिजे, सत्ता, वासना, अहंकार या युध्दामागच्या मुळ प्रेरणा मद्याची धुंदी स्त्री देहाची लालसा, राजकीय कारस्थाने, मृत्युची भिती, साऱ्या भावभावनांचा प्रत्ययकारी नाट्य घटोत्कच मध्ये आहे हे नाटक अतिशय वेगळे सादर केले आहे. त्याचा आशय महत्व पुर्ण आहे या नाटकात संगीत महत्वाचे आहे गायकीचा पण खूप मोठा वाटा होता. वेशभूषेचा देखील खूप मोठा वाटा होता हे सगळ करीत असताना ते समकालीन नाटक वाटत होते असे म्हणता येईल.

**ए आपण चहा घ्यायचा ?**

“चंद्रकांत देशपांडे लिखीत व अभिजित झुंजारराव दिग्दर्शीत ए आपण चहा घ्यायचा ? हे नाटक सादर झाले दोन कुटूंबाच्या जीवनावर आधारीत हे नाटक ब्लॅक कॉमेडीच्या माध्यमातून नाते संबंधावर तिरकस भाष्य करण्यात आले आहे.” यांची शैली कशी आहे हे वरील संदर्भातून दिसून येते मनुष्य स्वत:च प्रश्न निर्माण करतो आणि त्यात अडकत जातो.मानवी मनोवस्थेचे दर्शन घडविणारे आणि नातेसंबंधावर भाष्य करणारे नाटक असून. आताच्या काळात कुटूंबाचे प्रश्न मानसिक आहेत या मुळे मानसिक अवस्थाकशी बदलत जाते. आणि त्यातुन कसे बदल घडत जातात याचे दर्शन या नाटकामध्ये घडते हे कौटूंबिक नाटक आहे किती वेगवेगळया शैलीतुन नाटक दिग्दर्शक करतात हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष:-**

दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांच्या दृष्टिने असणारे वेगवेगळ्या कौशल्यचा अभ्यास करुन त्यांचा दिग्दर्शिकिय दृष्टिकोन कसा वेगळा आहे हे स्पष्ट होते. ‘लेझीम खेळणारे पोर’ या नाटकामध्ये कवितेचा बाज असणारे नाटक असून त्या नाटकाला दिग्दर्शकाने पथनाट्याचे स्वरुप येऊ न देता मुक्तछंदातून नाटक सादर केले आहे. ‘दर्दपोरा’ मध्ये सामाजिक वास्तव दाखवण्यात आले आहे. तर ‘माकड’ या नाटकात राजकीय विषयावर भाष्य करण्यात आले असून , ‘घटोत्कच’ या नाटका मध्ये मॅथो चे स्वरुप न येऊ देता आजचे वास्तव नाटकात दाखवले आहे, ‘ए आपण चहा घ्यायचा ?’ हा कौटूंबिक विषय आहे वेगवेगळ्या विषयाच्या सादरीकरणा वरुन तसेच तांत्रीक बाजु मध्ये देखील वेगळे पण दिसत आहे त्यामुळे दिग्दर्शक म्हणून त्यांचे दिग्दर्शकीय कौशल्य कसे वेगळे आहे हे स्पष्ट होते.

**संदर्भ सूची :**

1) मासिक,कनक,रंगवाचा, वर्ष तिसरे :- अंक चौथा -नोव्हेंबर 2019
2) कामगार कल्याण नाट्यमहोत्सव लोकमत जाहिरात नाशिक (05/02/2013)
3) रविन्द्र पाथरे :- लोकसत्ता जाहिरात (11/03/2018)
4) वसंतराव आचरेकर , सांस्कृतीक प्रतिष्ठान आयोजित
(मच्छिंद्र कांबळी स्मृती नाट्यउत्सव कणकवली सन 2020-वर्ष 28 वे)
5) प्रत्यक्ष मुलाखत :- दिग्दर्शक अभिजित झुंजारराव.